**महाराष्ट्र शासन**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड, नाशिक - 422101**
**दुरध्वनी क्र. 0253-2461909** **Email- kumbhmela.2027@mah.gov.in**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/मुसबैठक/2025/22 दिनांक: स्वाक्षरीखाली नमूद आहे.

प्रति,

सर्व अंमलबजावणी अभिकरण/ कार्यान्वयीन यंत्रणा,
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.

विषय: दिनांक 12/09/2025 रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा 2027 च्या लेखाशीर्षातील अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.
संदर्भ:- कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक नामपा 2024/प्र.क्र.210/ नवि-25 दिनांक 23/09/2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन दिनांक 12/09/2025 रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे सिंहस्थ कुंभमेळा 2027 च्या लेखाशीर्षातील अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त यासोबत पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत आहे.

सोबत. वरिलप्रमाणे.

Signed by Karishma
Nandakumaran Nair
Date: 30-09-2025 17:04:22

(करिष्मा नायर)
कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण

| अ.क्र. | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी, अहिल्यानगर. |
| 2 | महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक. |
| 3 | आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. |
| 4 | पोलीस आयुक्त, नाशिक शहर. |
| 5 | पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. |
| 6 | मुख्य कार्यकारी अधिकारी, देवळाली कटक मंडळ, नाशिक. |
| 7 | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. |
| 8 | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर. |
| 9 | प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक. |
| 10 | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नाशिक |
| 11 | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण. |
| 12 | अधीक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक. |
| 13 | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक. |
| 14 | उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक विभाग. |
| 15 | कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक |
| 16 | जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक. |
| 17 | उपवनसंरक्षक, पश्चिम विभाग/ पुर्व विभाग नाशिक. |
| 18 | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक. |
| 19 | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक. |
| 20 | कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नाशिक. |
| 21 | कार्यकारी अभियंता, **MSIDC**, नाशिक. |
| 22 | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक. |
| 23 | सहसंचालक, अन्न व औषध, नाशिक. |

| अ.क्र. | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|
| 24 | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक. |
| 25 | जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक. |
| 26 | उपसंचालक, पर्यटन विभाग, नाशिक. |
| 27 | सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक. |
| 28 | मुख्य कार्यकारी अधिकारी, **NMSCDCL.** |
| 29 | मुख्याधिकारी, त्रिंबक नगरपरिषद, त्र्यंबकेश्वर. |
| 30 | या शिवाय ज्या ज्या विभागांमार्फत कुंभमेळ्याशी संबंधित कामे घेण्यात येतील असे सर्व विभाग व कार्यालये. |

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

४ था मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२

Email ID : **ud२५.urban-mh@mah.gov.in**

---

क्र. नामपा-२०२४/प्र.क्र. २१०/नवि-२५ दिनांक : २३, सप्टेंबर, २०२५

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
२) अपर मुख्य सचिव , वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) अपर मुख्य सचिव , जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
४) अपर मुख्य सचिव , ऊर्जा विभाग,मंत्रालय,मुंबई.
५) अपर मुख्य सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) अपर मुख्य सचिव , परिवहन व बंदरे विभाग,मंत्रालय,मुंबई.
७) अपर मुख्य सचिव , नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
८) अपर मुख्य सचिव , नगर विकास विभाग (नवि-१),मंत्रालय,मुंबई.
९) अपर मुख्य सचिव , मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव ,माहिती तंत्रज्ञान विभाग,मंत्रालय,मुंबई.
११) अपर मुख्य सचिव , वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
१२) प्रधान सचिव,पर्यटन विभाग,मंत्रालय,मुंबई.
१३) प्रधान सचिव ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
१४) पालक सचिव,नाशिक तथा प्रधान सचिव ,ग्रामविकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१५) सचिव,सांस्कतिक कार्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
१६) सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई.
१७) सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,मंत्राल,मुंबई.
१८) अ.मु.स/प्र.स/सचिव,मंत्रालय,मुंबई (सर्व विभाग)
१९) विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,नाशिक.
२०) जिल्हाधिकारी,नाशिक.
२१) जिल्हाधिकारी,अहिल्यानगर.
२२) आयुक्त,नाशिक महानगरपालिका.
२३) कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,नाशिक.

**विषय :- सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या लेखाशीर्षातील अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन नाशिक सिंहस्थ कुंभमेळयाच्या अनुषंगाने लेखाशीर्षातील तरतूद अपुरी असल्यामुळे विविध लेखाशीर्ष आणि योजनांचे अभिसरण करणे किंवा कुंभमेळा लेखाशीर्षातील तरतूद वाढविण्याच्या दृष्टीने बैठक बोलाविणेबाबत विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण,नाशिक यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक.१२.०९.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे

दालन, ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२ येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

**आपला,**

सोबत : वरीलप्रमाणे.

23/09/2025

**(मो.क. बागवान)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत : माहितीस्तव अग्रेषित -**

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

२) अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

३)उप सचिव (नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.

**दिनांक १२/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या लेखाशीर्षातील अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत या विषयांबाबत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

---

सदर बैठकीला उपस्थित मान्यवरांची यादी सोबत जोडली आहे.

दिनांक १२/०९/२०२५ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या लेखाशीर्षातील अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत बैठक झाली.

बैठकीमध्ये अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजनाबाबत व विशेषतः त्याच्या आर्थिक तरतुदींबाबत सविस्तर सादरीकरण केले. त्यांनी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा अधिनियम २०२५ च्या तरतुदींकडे व विशेषतः कुंभमेळा निधी तयार करणे आणि त्याचे व्यवस्थापन करण्याच्या कलम १५ कडे लक्ष वेधले. तसेच कुंभमेळा नियोजनासाठी विविध विभागांनी आतापर्यंत रुपये १७१५३ कोटी, विविध लोकप्रतिनिधी यांनी रुपये ५५४० कोटी आणि विविध आखाडे / संस्था इत्यादींनी रुपये ८२९ कोटी इतक्या रकमेच्या कामांची कामे सुचवली आहेत किंवा मागणी केली आहेत, असे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे आत्तापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रुपये २२७०.६० कोटीची रस्त्याच्या कामाच्या निविदा झाल्या आहेत आणि याशिवाय नगरविकास विभागाच्या मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७३५७, १९१, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, शहर सुधार मंडळे, इत्यादींना सहाय्य, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (००) (००) (९७) सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी यावरील खर्चाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम) या शीर्षामधून रुपये १००० कोटींची तरतूद चालू अंदाजपत्रकात करण्यात आली आहे, असे सांगण्यात आले.

कुंभमेळ्यासाठी विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या कामांच्या मागण्यांच्या अनुषंगाने ज्या कामांना अंमलबजावणीसाठी अधिक कालावधी लक्ष लागणे शक्य आहे, अशा कामांच्या बाबतीत अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी विविध विभागांची एकूण रुपये ५१४०.०१ कोटीच्या कामांच्या निविदा प्रसिद्ध करून ती कामे सुरू करण्याबाबतचे निर्देश संबंधित विभागांना दिल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे रुपये १००० कोटीची आर्थिक तरतूद असताना रुपये ५१४०.०१ कोटीची कामे आवश्यकतेमुळे आणि परिस्थितीमुळे सुरू केल्यामुळे, त्याचप्रमाणे उर्वरित मागण्यांची संख्या मोठी असल्यामुळे यासाठी निधीचे नियोजन, वेगवेगळ्या निधीचे नियोजन शासन स्तरावर, नगरविकास-२ च्या कुंभमेळा निधीतून आणि/ किंवा संबंधित विभागांच्या संबंधित योजना/ लेखाशीर्षांमधून करण्यात यावे, अशी विनंती त्यांनी केली आहे. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी असे सांगितले की, नाशिक महानगरपालिकेच्या कामांच्या एकत्रित रकमेच्या २५ टक्के निधी एकत्रितरित्या ते त्यांचा वाटा म्हणून देण्यास तयार आहेत.

बैठकीत मा. अध्यक्ष यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेतः

| अ. क्र. | मा. अध्यक्षांचे निर्देश | संबंधित विभाग |
|---|---|---|
| १ | नाशिक विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रक तयार करावे आणि त्याबाबतची तरतूद शासनाच्या विविध पर्यायातून (उदा. नगर विकास, कुंभ, विमान चालन, सार्वजनिक बांधकाम विभाग इत्यादी) करण्यात यावी. | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय |
| २ | सर्व विभागांच्या सचिवांनी त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयाने कुंभमेळ्याशी संबंधित प्रस्तावित केलेल्या कामांचा आढावा घ्यावा. त्यातील व विशेषतः वर नमूद रुपये ५१४०.०१ कोटींपैकी त्यांच्या दृष्टीने जी कामे कुंभमेळ्यासाठी अत्यावश्यकच आहे केवळ तीच कामे त्यांनी कुंभमेळ्यासाठी त्यांचे स्वतःच्या विभागाच्या लेखाशीर्षातून / योजनेतून | सर्व विभाग |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावित करावे आणि तसा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करावा. | |
| ३ | कामे प्रस्तावित करताना सदरची कामे कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने परिपूर्ण असावी असावी व असंबध्द व इतर कामे प्रस्तावित करू नये. सदर कामाचे कुंभमेळ्यासाठीची निष्पत्ती (Output) संबंधित विभागाने स्पष्टपणे तपासावी आणि तसे नमूद करावे. त्याचप्रमाणे एखादा खर्च पर्यायी मार्गाने कमी होत असल्यास (उदा. भाडेतत्व, अधिग्रहण, पीपीपी, इ.,) त्याप्रमाणे तसे नियोजन करावे (उदा. टेंट सिटी), | सर्व विभाग |
| ४ | नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाला नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियम २०२५ चे कलम १५ नुसार कुंभमेळा निधीसाठी PLA व आवश्यकतेप्रमाणे बँक खाते उघडण्याची परवानगी द्यावी व सर्व विभाग तसेच शासकीय कंपन्या, मंडळे आणि महामंडळाचा कुंभमेळ्याशी व सलग्न उपक्रमाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंधित असलेल्या प्रस्तावित व चालू असलेल्या बांधकामांसाठी, प्रकल्पांसाठी किंवा प्रापणांसाठी असलेला सर्व निधी व अनुदाने प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी संबंधित निधी वित्त विभागाने किंवा सक्षम प्राधिकारी यांनी या खात्यात वर्ग करावा. | वित्त विभाग, मंत्रालय |
| ५ | विभागीय आयुक्त यांनी या निधीत विविध विभागाच्या योजना आणि लेखाशीर्षातून प्राप्त होणाऱ्या निधीचा हिशोब ठेवावा आणि त्या त्या लेखाशीर्षातून/ योजनेतून प्राप्त होणारा निधी त्याच कामांवर खर्च होईल याची पूर्ण दक्षता घ्यावी. | विभागीय आयुक्त, नाशिक |
| ६ | नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचा आकृतीबंध यथाशीघ्र मान्य करावा, | नगर विकास विभाग-२, मंत्रालय |

| | | |
|---|---|---|
| ७ | अधिक कालावधी लागणारी जी कामे मंजूर करण्यात आली आहेत त्यांची यथाशीघ्र सुरुवात करावी. | १. सर्व विभाग<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक |
| ८ | नगर विकास विभागाने कुंभमेळा शिर्षातून (मागणी क्र. एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७३३५७, १९१, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरविकास प्राधिकरणे, शहर सुधार मंडळे, इत्यादींना सहाय्य, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (००) (००) (९७) सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व अंमलबजावणी यावरील खर्चाकरिता सहायक अनुदान (कार्यक्रम).,) कोणकोणती कामे घेता येतील याबाबतचे मार्गदर्शक आदेश निर्गमित करावेत. | नगर विकास विभाग-२, मंत्रालय |
| ९ | आपत्ती व्यवस्थापन विभागाने त्यांचेकडील निधीतून कुंभमेळ्याशी संबंधित प्रस्तावित कामांना मान्यता द्यावी. | आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय |
| १० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची कामे राज्य शासनाच्या निधीतून प्रस्तावित करावीत. | १.ऊर्जा विभाग, मंत्रालय<br>२.विभागीय आयुक्त, नाशिक |
| ११ | साधुग्राम भूसंपादनाबाबत यंदा (२०२७ साठी) तात्पुरत्या स्वरुपाच्या भूसंपादनाद्वारे पुढे जाणे सुरु करावे. दरम्यान कायमस्वरुपी भूसंपादनासाठी आर्थिक व्यवहार्यता तपासून तसा प्रस्ताव सादर करावा. | १.नगर विकास विभाग-१, मंत्रालय<br>२.आयुक्त, नाशिक महानगरपालिका |

**वरील प्रमाणे चर्चा होऊन व निर्णय होऊन बैठक समाप्त झाली.**

**********